# वेग प्रगतीचा...
# सन्मान बँकेचा...



## ठेवी
## ₹ १०३१
## कोटी

**१८ वा**
**वार्षिक अहवाल**
सन २०१८-१९

जिथं जिव्हाळा जोपासला जातो ...

# दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

स्थापना - १९२१

RBI Lic. No. : UBD. MH. 450 P Dt. 01/03/1986
प्रधान कार्यालय : ५९१, गणपती आळी, वाई, जि.सातारा. फोन : ०२१६७-२२०७७७, फॅक्स : २२०५७७
Website : www.waibank.co.in | Email : wub@rediffmail.com

# दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

## संचालक मंडळ



**सीए. चंद्रकांत काळे**
अध्यक्ष



**राजेंद्र चावलानी**
उपाध्यक्ष



**डॉ. विनय जोगळेकर**
संचालक



**मदनलाल ओसवाल**
संचालक



**ॲड. प्रतापराव शिंदे**
संचालक



**विवेक भोसले**
संचालक



**ॲड.सीए. राजगोपाल द्रवीड**
संचालक



**विद्याधर तावरे**
संचालक



**मनोज खटावकर**
संचालक



**प्रा. विष्णू खरे**
संचालक



**भालचंद्र देशपांडे**
संचालक



**डॉ. शेखर कांबळे**
संचालक



**स्वरूप मुळे**
संचालक



**सौ. अंजली शिवदे**
संचालिका



**सौ. गीता कोठावळे**
संचालिका



**सीए. किशोरकुमार मांढरे**
तज्ज्ञ संचालक



**श्रीपाद कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

जिथं जिव्हाळा जोपासला जातो ...

# दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

५९१, गणपती आळी, वाई, जि.सातारा. फोन : ०२१६७-२२०७७७
Email : wub@rediffmail.com | www.waibank.co.in



## कै.वेदमुर्ती शंकरराव अभ्यंकर (गुरूजी) यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



ऑगस्ट २०१९ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या महापुरातील आपदग्रस्तांच्या मदतीकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रु. २५ लाखांचा धनादेश मुख्यमंत्री मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्त करताना बँकेचे अध्यक्ष मा. सीए. श्री. चंद्रकांत काळे, ज्येष्ठ संचालक मा.डॉ. श्री. विनय जोगळेकर व मान्यवर संचालक सदस्य.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्षा मा.सौ. पद्मा कुबेर यांच्याकडे महापूर आपदग्रस्तांसाठी रू. १.५१ लाखांचा धनादेश प्रदान करताना बँकेचे अध्यक्ष मा.सीए. श्री. चंद्रकांत काळे, उपाध्यक्ष मा.श्री. राजेंद्र चावलानी व मान्यवर संचालक मंडळ सदस्य.



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांनी बँकेस सदिच्छा भेट दिली त्यावेळी त्यांचा सत्कार करताना बँकेचे अध्यक्ष मा.सीए. श्री. चंद्रकांत काळे, उपाध्यक्ष मा.श्री. राजेंद्र चावलानी, संचालक मा.श्री. विवेक भोसले, मा.प्रा.श्री. विष्णु खरे, मा.डॉ.श्री. शेखर कांबळे, सीईओ मा. श्रीपाद कुलकर्णी.




दहावीतील उत्तुंग यशाबद्दल गुणवंत विद्यार्थी अथर्व वाघ, साहिल जायगुडे,आकाश पानसे व तेजल पेटकर यांचा सत्कार करताना बँकेच्या संचालिका मा.सौ. गीता कोठावळे, संचालक मा.श्री. विवेक भोसले, मा.डॉ.श्री शेखर कांबळे,मा.सीए.श्री. किशोरकुमार मांढरे, अध्यक्ष मा.सीए. श्री. चंद्रकांत काळे, उपाध्यक्ष मा.श्री. राजेंद्र चावलानी व मान्यवर संचालक.




सोनगिरवाडी शाखेत जागतिक महिला दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात वाईच्या नगराध्यक्षा मा.डॉ.सौ. प्रतिभाताई शिंदे यांचा सत्कार करताना बँकेच्या संचालिका मा.सौ. अंजली शिवदे, मा.सौ. गीता कोठावळे, सोबत माजी संचालिका सौ. कविता अभ्यंकर, सौ. सुवर्णा काळे, सौ. भारती चावलानी, सौ. सुवर्णा ओसवाल, सौ. शुभदा नागपुरकर तसेच बँकेचे अध्यक्ष मा.सीए. श्री. चंद्रकांत काळे, उपाध्यक्ष मा.श्री. राजेंद्र चावलानी, मान्यवर संचालक सदस्य



विश्वकोष निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित त्रिवेणी साहित्य संगम स्थळाचे मंडप शुभारंभ पुजन करताना बँकेचे अध्यक्ष मा.सीए. श्री. चंद्रकांत काळे, शेजारी नगराध्यक्षा मा.डॉ. सौ. प्रतिभाताई शिंदे, बँकेचे उपाध्यक्ष मा.श्री. राजेंद्र चावलानी, विश्वकोषचे सचिव मा.श्री. शामकांत देवरे, आदी मान्यवर.

# दि वाई अर्बन को-ऑप. बँक लि., वाई

**प्रधान कार्यालय : ५९१, गणपती आळी, वाई, ता.वाई, जि.सातारा. पिन : ४१२८०३. ☎ : ०२१६७-२२०७७७**

## ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

**दि वाई अर्बन को-ऑप. बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. १० सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता,धनश्री मंगल कार्यालय, शहाबागफाटा, वाई-पुणे रोड, वाई येथे पुढील नमूद केलेल्या विषयांचा विचार करणेसाठी आयोजित केली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.**

### ● सभेपुढील विषय ●

१) दिनांक २० सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०१८-२०१९ या आर्थिक सालचा अहवाल व दि. ३१/०३/२०१९ अखेरचा मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटापत्रक स्विकृत करणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०१८-२०१९ सालचे नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०१८-२०१९ चा मा. वैधानिक लेखापरीक्षकांचा तपासणी अहवालाची व सन २०१७-२०१८ च्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०१८-२०१९ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे, तसेच सन २०१९-२०२० च्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
७) सांगली, कोल्हापूर पूरग्रस्तांना देणेसाठी मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिलेल्या 'निधी'स मान्यता देणेबाबत.
८) महाराष्ट्र शासनाच्या एकरक्कमी परतफेड योजने अंतर्गत सवलत दिलेल्या कर्ज रक्कमांची माहिती घेणे व संचालक मंडळाच्या निर्णयांची नोंद घेणे.
९) मा. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली संशयीत व बुडीत कर्जे येणेबाकी कर्ज वसुलीचे अधिकार अबाधित राखून केवळ निर्लेखित करणेस मंजूरी देणे.
१०) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मान्यता देणे.
११) सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

(मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार)

**ठिकाण : वाई, जि.सातारा**

**दि. : २६/०८/२०१९**

श्रीपाद कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

### ● विशेष सूचना ●

१) गणसंख्येच्या पूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा, त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक ११.०० वाजता होईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभेचे कामकाज मर्यादित वेळेत पार पाडता यावे, यादृष्टीने ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा अहवाल व ताळेबंद विषयक विधायक स्वरूपाची माहिती विचारावयाची असेल त्यांनी कृपया दि. ०५/०९/२०१९ पर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी विचारणा करावी, म्हणजे माहिती देणे शक्य होईल. ऐनवेळेस विचारलेली माहिती वा आकडेवारी लगेच देणे शक्य होईलच असे नाही.
३) बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या संकेतस्थळी (वेब साईट) www.waibank.co.in वर पाहता येईल. तसेच अहवालाच्या प्रती सर्व शाखांत उपलब्ध केलेले आहेत, सभासदांनी आपली अहवाल प्रत कृपया नजिकच्या शाखेतून घेऊन जावी.
४) कृपया वार्षिक सभेस येताना शासनाने निर्देशित केलेले ओळखपत्र घेऊन यावे, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
५) सभासद ट्रस्ट / संस्था यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस संस्थेतर्फे उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधी बाबतचा ठराव सभेपूर्वी बँकेस मिळेल असा पाठवावा.
६) सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास त्याची नोंद बँकेत करावी तसेच आपला ई-मेल, व्हॉटसअॅप नंबर बँकेकडे नोंद करावा.
७) बँकेच्या सुधारित पोटनियमानुसार प्रत्येक सभासदाने पाच वर्षातून किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, अनिवार्य आहे.

● प्रकाशक : श्री. श्रीपाद कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी ● मुद्रक : हरि ॐ प्रिंटर्स, वाई ●

# संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| सीए. चंद्रकांत वामनराव काळे | अध्यक्ष | चार्टर्ड अकौंटंट |
| डॉ. श्री. विनय मुकुंद जोगळेकर | संचालक | डॉक्टर |
| अॅड. प्रतापराव कृष्णराव शिंदे | संचालक | सेवानिवृत्त न्यायाधीश |
| अॅड. सीए. राजगोपाल काशिनाथ द्रविड | संचालक | वकिल |
| श्री. मनोज श्रीधर खटावकर | संचालक | बांधकाम व्यावसायिक |
| श्री. भालचंद्र विनायक देशपांडे | संचालक | उद्योजक |
| श्री. स्वरूप अरूण मुळे | संचालक | व्यापारी |
| सौ. गीता अरविंद कोठावळे | संचालिका | सेवानिवृत्त बँकर |
| श्री. राजेंद्र खिअलकुमार चावलानी | उपाध्यक्ष | बांधकाम व्यावसायिक |
| श्री. मदनलाल किसनलाल ओसवाल | संचालक | व्यापारी |
| श्री. विवेक वसंतराव भोसले | संचालक | शेती, सामाजिक कार्यकर्ते |
| श्री. विद्याधर विष्णूपंत तावरे | संचालक | सेवानिवृत्त बँकर |
| प्रा. विष्णू मधूकर खरे | संचालक | निवृत्त प्राध्यापक |
| डॉ. शेखर बाळकृष्ण कांबळे | संचालक | डॉक्टर |
| सौ. अंजली दिलीप शिवदे | संचालिका | सेवानिवृत्त बँकर |
| सीए. किशोरकुमार नामदेवराव मांढरे | तज्ज्ञ संचालक | चार्टर्ड अकौंटंट |

## बँकेचा प्रमुख अधिकारी वर्ग

### मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. श्रीपाद कुलकर्णी
एम्.कॉम. एम.ए. (अर्थशास्त्र), सी.ए. आय.आय.बी., जी.डी.सी.अॅण्ड ए, डिप्लोमा इन टॅक्सेशन

### प्र. उपसरव्यवस्थापक

श्री. चंद्रशेखर श. काळे — बी.एस्सी., जी.डी.सी. अॅण्ड ए., जे.ए.आय.आय.बी.

श्री. संतोष अ. बागुल — बी.एस्सी., सी.ए.आय.आय.बी.

श्री. सिद्धार्थ कांबळे — बी.कॉम.

### सहा. सरव्यवस्थापक

श्री. शाम रा. करंबळीकर — लोणंद

श्री. आनंद पटवर्धन — वाई

श्री. प्रसाद मा. कुंभारे — गुंतवणूक विभाग

श्री. अविनाश कुलकर्णी — पुणे विभाग

श्री. सुहास पानसे — कर्ज विभाग

### वैधानिक लेखापरिक्षक

मे. एल. के. एस. अॅण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे

### अंतर्गत लेखापरिक्षक

सीए. डी. बी. खरात अॅण्ड कंपनी, वाई
सीए. स्वप्निल के बचुटे अॅण्ड कंपनी, पुणे
ए.एस. देव अॅण्ड कंपनी सीए. सारंग देव, पुणे
सीए. डी. बी. टी. अॅण्ड असो., पुणे
सीए. मयुर देवी अॅण्ड असोसिएटस्, सातारा
सीए. अभिजीत जोशी अॅण्ड असोसिएटस्, पुणे
सीए. के. व्ही. ठोंबरे अॅण्ड कंपनी, मिरज
सीए. देशपांडे अॅण्ड पाटेकर, पुणे

# अध्यक्षांचे मनोगत



**सीए. सी. व्ही. काळे**
अध्यक्ष

**सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,**
**सस्नेह नमस्कार,**

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणां सर्वांशी हितगुज करण्याची संधी मला प्राप्त होत आहे. त्याच बरोबर आपण विश्वासाने आम्हांला संचालक म्हणून बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे जे दायित्त्व प्रदान केले आहे. त्यास आम्ही पात्र राहून संचालक मंडळींनी बँकेच्या प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आणि त्यास लाभलेल्या यशाचा लेखाजोखा बँकेचा अध्यक्ष म्हणून आपणासमोर ठेवण्याची संधी मला प्राप्त होत आहे, याचा मला अतिशय आनंद होत आहे.

आज एकूणच बँकींग क्षेत्र फार मोठ्या संक्रमणाचे अवस्थेतून जात आहे. विलिनीकरणाचे आणि एकूणच बँकांची संख्या कमी करून मोजक्याच सशक्त व्यापारी बँका ठेवण्याचे सरकारचे धोरण दिसते आहे. सहकारी बँकांची ही संख्या दरवर्षी कमी होत चालली आहे. अशातच सहकारी बँकांसमोर अनेक स्पर्धक, स्मॉल फायनान्स बँका आणि पेमेंट बँकांद्वारे उभे ठाकले आहेत. भांडवल पर्याप्तता व वैधानिक तरलता यांचे प्रमाण ठेवण्यामध्ये सरकार वा रिझर्व्ह बँक मदतीचा हात देत नाही. त्यातच सहकार खाते आणि रिझर्व्ह बँक यांचे दुहेरी नियंत्रण हे सुद्धा त्रासदायक ठरत आहे. आज वाढती अनुत्पादीत कर्जे हा मोठा यक्ष प्रश्न इतर बँकांप्रमाणे सहकारी बँकांसमोरही आहे. यांमुळे नफा क्षमतेवर मोठा परिणाम होत आहे. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि तो टिकवणे हे सुद्धा फार मोठे आव्हान आहे. नुकतेच महाराष्ट्रातल्या एका मोठ्या सहकारी बँकेवर सायबर हल्ला झाला. त्यामुळे माहिती सुरक्षा आणि त्यासाठी परिपूर्ण विकसीत तंत्रज्ञानाचा अवलंब आणि सततची त्यावरची देखभाल याबाबतची जोखीम व जबाबदारी वाढली आहे. उच्च तंत्रज्ञानासाठीची गुंतवणूक फार मोठी आहे. त्यासाठी शिक्षित व निष्णांत कर्मचारी वर्ग मिळविणे व तो टिकवून राहणे यासाठी मोठी कसरत करावी लागते आहे. थोडक्यात प्रचंड स्पर्धा, व्याजदराचे विनियंत्रण, तंत्रज्ञानाचा रेटा, चांगल्या कर्मचाऱ्यांची वानवा, नियंत्रकांची कठोरता, वैधानिक तरतुदी आणि विवेक निकषांची कठिण पूर्तता ही मोठी आव्हाने सर्व सहकारी बँकांसमोर आज आहेत.

या कठिण आव्हानात्मक परिस्थितीतही आपल्या संचालक मंडळाने जोखीम व्यवस्थापन आणि निधीचे सुयोग्य नियोजन करत पुरोगामी व प्रगतिशील धोरणात्मक निर्णय घेत आपल्या बँकेचा प्रगतीचा वेग कायम ठेवला आहे. पारदर्शक आणि विश्वस्ताचे भूमिकेतून सचोटीचा कारभार हेच आपले ध्येय मानून बँकेचा कारभार अत्यंत चोख ठेवीत संस्थेची चौफेर प्रगती साधली आहे. विनम्र आणि तत्पर ग्राहक सेवा हेच आपल्या बँकेचे बलस्थान आहे. त्याला आधुनिकतेची आणि नव्या तंत्रज्ञानाची जोड देत, सहकाराच्या सातही मूल्यांचे जतन करीत, व्यावसायिकता आणि नफा क्षमता वाढवत, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन असलेली बँक यांसाठीच्या रिझर्व्ह बँकेचे सर्व मानांकनांची पूर्तता करत तसेच वरील सर्व अडचणींवर यशस्वी मात करत. आज आपल्या बँकेची प्रगतीची घोडदौड चालू आहे. वार्षिक अहवालात नमूद केलेली आकडेवारी या गोष्टींची द्योतक आहे. यामध्ये सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक आणि हितचिंतक यांचा सक्रीय सहभाग आहे, याची आम्हांस पूर्ण जाणिव आहे.

बँकेचे भागभांडवल रूपये २५ कोटींचेवर गेले आहे. तर सभासद संख्याही २० हजारांच्या पुढे गेली आहे. भांडवल पर्याप्तता प्रमाण जे रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार ९% इतके पाहिजे आहे. ते सुद्धा १३.३७% आहे. अहवाल सालाचे अखेरीस एकूण ठेवी रूपये ९२.८१ कोटी रूपयांनी वाढवून त्या ९३१.९९ कोटी इतक्या झाल्या आहेत. आनंदाची व अभिमानाची बाब म्हणजे आजमितीस **या ठेवींनी रूपये १०३१ कोटी रूपयांचा टप्पा ओलांडला आहे.** भारतातील एकूण १५५३ नागरी सहकारी बँकांपैकी काही मोजक्याच बँकांच्या ठेवी रूपये १००० कोटींचे वर आहेत. अशा मोठ्या बँकांमध्ये आपल्या बँकेची गणना आता झाली आहे. यासाठी तुम्हां सर्वांचा संचालक मंडळावरील आणि बँकेवरील विश्वास हाच कारणीभूत आहे. याची मला पूर्ण जाणीव आहे. कर्ज व्यवहारांत मंदी असूनही अहवाल सालात कर्जव्यवहारातही रू. ६८.३० कोटींची वाढ होऊन वर्षाअखेरीस येणे कर्जे रू. ६३१.६०

कोटी एवढी झाली आहेत. एवढी वाढ होऊनही ढोबळ अनुत्पादित कर्जे(ग्रॉस एनपीए) फक्त ४.२८ टक्के तर नक्त अनुत्पादित कर्जे(नेट एनपीए) फक्त १.०७ टक्के इतकीच राखण्यात आपल्याला यश आले आहे. यामध्ये कर्जदार सभासद यांचे सहकार्य आणि कर्मचाऱ्यांनी वसुलीसाठी केलेले अथक प्रयत्न यांचे फार मोठे योगदान आहे. यामुळेच नफा क्षमताही भरघोस वाढली असून इन्कमटॅक्स वजा जाता एकूण नक्त नफा (नेट प्रॉफिट) रू. ८.५२ कोटी इतका झाला आहे. अहवाल सालांत शाखा विस्तारही २६ वरून ३० वर गेला आहे. तर एटीएमची संख्या १६ वरून २४ वर गेली आहे. विशेष म्हणजे वेळे येथे पुणे-सातारा महामार्गावर तर पांचगणी-महाबळेश्वर रस्त्यावर मोक्याचे ठिकाणी दोन ऑफसाईट एटीएम केंद्रे आपण सुरू केली आहेत.

व्यवसायवृद्धी करीत असताना आणि नफा-क्षमता वाढवत असताना सामाजिक बांधिलकीसुद्धा बँक विसरलेली नाही. वाईतील विविध संस्था, सामाजिक, सांस्कृतिक आणि सातही कृष्णाबाई संस्थांन घाट उत्सव मंडळे यांना बँकेने वेळोवेळी आर्थिक मदत केली आहे. सभासद व कर्मचारी यांच्या गुणवत्ताप्राप्त पाल्यांना आर्थिक बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यासही आम्ही विसरलो नाही. सभासदांचा रूपये तीन लाखांचा अपघाती विमा बँकेने उतरविला आहे. तर कर्मचाऱ्यांचाही रूपये पाच लाखांची टर्म लाईफ पॉलीसी काढली आहे. या विमा हप्त्याची रक्कम बँक भरत असते. तसेच ठेवीदारांचे ठेवींचे विमा नियमाप्रमाणे काढला असून त्याचाही विमाहप्ता ठेव विमा महामंडळाकडे आदा केला आहे.

बदलत्या बँकिंगचे आणि तंत्रज्ञानाचे कर्मचाऱ्यांना ज्ञान व्हावे आणि त्यांचे कार्यकौशल्य वाढावे. यासाठी सर्व स्तरांवरील कर्मचाऱ्यांना सतत बँकेमध्ये आणि बाहेरील प्रशिक्षण संस्थांत पाठवून त्यांना प्रशिक्षण देणेसाठी बँक भरघोस गुंतवणूक करत असते. त्यांचे कलागुणांना, साहित्य गुणांना वाव मिळावा, त्याचबरोबर त्यांचे बँकिंगचे ज्ञान वाढावे, यासाठी दर सहामाहीस अंतर्गत वितरणासाठी विनामूल्य अशी **जिव्हाळा** नावाची पुस्तिका प्रकाशित होते. ही प्रक्रिया गेली आठ वर्षे सातत्याने सुरू आहे.

नजिकचे भविष्यामध्ये अनेक नव्या गोष्टी बँकेत कार्यान्वित करण्याचा आमचा मानस आहे. लवकरच बँकेच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू होईल आणि एक आधुनिक सोयींनीयुक्त अशी प्रशस्त स्वमालकीची वास्तू उभी राहिल. आपल्या बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा मिळावा, यासाठीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेचे विचाराधीन असून लवकरच याबाबतची अधिसूचना जारी होईल, असा विश्वास वाटतो. तसेच आपली बँक मल्टीस्टेट करण्याबाबतही आम्ही प्रयत्नशील आहोत. लवकरच इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग या सेवाही कार्यान्वित होतील.

अशा तऱ्हेने प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करत असताना शतक महोत्सवाकडे बँकेची दमदार वाटचाल सुरू आहे. हे सर्व तुम्हां सर्व सभासदांचे आमच्यावर आणि बँकेवर असलेले विश्वासामुळेच शक्य होत आहे, याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. सबका साथ-सबका विकास आणि सबका विश्वास हेच आमचे ब्रीद वाक्य आहे. म्हणूनच आज बँकिंग क्षेत्रात आणि विशेषतः सहकारी बँकिंगसमोर अनेक आव्हाने असूनही आपली बॅक प्रगतीची घोडदौड चालू ठेवत आहे. यामध्ये जसा सर्व सभासद ग्राहकांचा सहकार्याचा हात आहे, तसाच बँकेच्या संचालकांचा पारदर्शी कारभार, व्यावसायिक दृष्टीकोन आणि विश्वस्ताची भूमिका यांचेही मोठे योगदान आहे. सर्व संचालक सदस्य अत्यंत प्रामाणिकपणे आणि एकसंधपणे केवळ बँकेचे हित हेच डोळ्यांसमोर ठेवून काम करीत आहेत. संचालक मंडळाच्या धोरणांची तंतोतंत व त्वरीत अंमलबजावणी कर्मचारी वर्ग करीत असतो. त्यांचाही बँकेच्या प्रगतीत सिंहाचा वाटा आहे. मी आपणांस विश्वास देऊ इच्छितो की, यापुढेही या गौरवशाली बँकेचा भविष्यकाळ उज्वल करण्याचा आम्ही पुरेपूर प्रयत्न करीत आहोत. मात्र या प्रयत्नांत तुमची नेहमीप्रमाणे सक्रीय साथ सतत आमच्यासोबत राहू दे, हीच विनंती.

सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतकांचे भक्कम पाठिंब्यामुळेच बँकेची प्रगतीची घोडदौड चालू आहे, ही कृतज्ञतेची भावना व्यक्त करून आणि यापुढील काळातही हाच विश्वास आणि जिव्हाळा आपण कायम ठेवावा, ही विनंती करून माझे मनोगत संपवितो.

जय हिंद - जय महाराष्ट्र - जय सहकार

सीए. चंद्रकांत वामनराव काळे, अध्यक्ष

# १८ व्या आर्थिक वर्षाचा वृत्तांत व संचालक मंडळाचा अहवाल

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,
सस्नेह नमस्कार,

आपल्या बँकेच्या ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आपणांसर्वांचे मी संचालक मंडळाचेवतीने मन:पूर्वक स्वागत करतो. दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजीचे वैधानिक लेखापरिक्षण झालेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व वैधानिक लेखापरिक्षकांचा आर्थिक वर्ष २०१८-१९ चा अहवाल तसेच अहवाल वर्षातील एकूणच बँकेच्या कामकाजाचा आणि प्रगतीचा आलेख आपणांसमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

**• भारतीय अर्थव्यवस्था व बँकिंग क्षेत्रांतील घडामोडी -**

आपला देश जगातील सर्वात वेगाने प्रगती करणारी अर्थव्यवस्था होण्याचे मार्गावर आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ ही इतर देशांच्या मानाने अहवाल सालात समाधानकारक राहिली असून जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या अर्थतज्ज्ञांनी भारतीय अर्थव्यवस्थेची प्रशंसाच केली आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेत त्या देशातील बँकिंग व्यवस्था हा कणा असतो. आपल्या देशात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली संपूर्ण बॅकिंग व्यवस्था ही अत्यंत सक्षम व आर्थिकदृष्ट्या सदृढ राहण्यासाठी अनेक विवेक निकष व परिपत्रके जारी केली जातात. भारतातील बँकिंग क्षेत्र आज फार मोठ्या संक्रमणाचे अवस्थेतून जात असून बँकांचे एकत्रीकरण करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले आहे. बँकांची संख्या कमी करून थोड्याच अत्यंत सक्षम व मोठ्या आकाराच्या बँका ठेवण्याच्या धोरणाचा भाग म्हणून या अगोदरच महाराष्ट्रातील तीन जुन्या खाजगी क्षेत्रातील बँकांचे मोठ्या बँकांमध्ये विलिनीकरण झाले. नुकतेच स्टेट बँकेमध्ये सुद्धा तिच्या सात सहयोगी बँकांचे विलिनीकरण झाले. आतातर दोन राष्ट्रीयकृत बँका, बँक ऑफ बडोदा मध्ये विलिनीकरण करून या धोरणास चालना दिली आहे. पुढेही ही प्रक्रिया सुरू राहून सहा ते आठ सशक्त व्यापारी बँका राहतील.

मात्र व्यापारी असो की सहकारी असो अहवाल सालात अनुत्पादीत कर्जामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. परिणाम स्वरूप मोठ्या तरतुदी बँकांना कराव्या लागल्या आहेत आणि त्यामुळेच नफा क्षमता ही कमी झाली आहे. कर्ज माफीची मागणी करायची आणि त्या अपेक्षेने कर्ज परतफेड बंद करून अनुत्पादित मालमत्तेत वाढ करण्याची कर्जदारांची मानसिकता हे नवे आव्हान सर्वच बँकांसमोर उभे राहिले आहे. विलफुल डिफॉल्टर्स म्हणजे ताकद असूनही कर्जे परत न करणारे कर्जदार ही नवीन जमात उदयास आली आहे. त्यामुळे थकीत कर्ज वसुली ही सर्वच बँकांची डोकेदुखी ठरली आहे. त्यात आपल्याकडे न्याय प्रक्रिया अत्यंत वेळ खाऊ असल्याने निकाल लवकर मिळत नाहीत. या आव्हानांबरोबरच बँकांवरचे सायबर हल्ले, माहिती तंत्रज्ञानाची चोरी हे गेल्यावर्षी फारच वाढले. त्यामुळे माहिती सुरक्षा (इन्फॉरमेशन सिक्युरीटी) ही सुद्धा फार मोठी जोखीम निर्माण झाली आहे. सुरक्षा यंत्रणा मजबूत ठेवण्यासाठी परिपूर्ण तंत्रज्ञान विकसीत करण्याची आणि त्यावर लक्ष ठेवण्याची तसेच त्यासाठी निष्णात व प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग मिळविण्याची बँकांची जबाबदारी वाढली आहे. दरवर्षी आय.एस. ऑडीट, सायबर सुरक्षा ऑडीट करणे रिझर्व्ह बँकेने बंधनकारक केले आहे. पण त्या ऑडीटरांच्या सुचनांची पूर्तता आणि अंमलबजावणी होणे तितकेच गरजेचे आहे. नवे तंत्रज्ञान अंमलात आणण्यासाठी हार्डवेअर व सॉफ्टवेअर या यंत्रणेचा खर्च हाही छोट्या बँकांना परवडणारा नाही.

सहकारी बँकांना या सर्व आव्हानांना सक्षमपणे तोंड देतानाच व्यावसायिकता अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे. आज सहकारी बँकांची संख्या ही दिवसेंदिवस कमी होत आहे. याचे प्रमुख कारण नियंत्रकाची कडक बंधने, विवेकपूर्ण निकषांची अवघड पूर्तता, योग्य भांडवल पर्याप्तता आणि तीव्र स्पर्धा. परंतू याही झंजावातात विनम्र व तत्पर ग्राहक सेवा आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे, तरूण ग्राहक आकर्षित करणे, सहकाराच्या सातही मुल्यांचे पालन करत व्यावसायिकता आणि नफा क्षमता वाढवत राहून आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन असणारी बँक या पात्रतेसाठी रिझर्व्ह बँकेची सर्व मानांकने पूर्ण करणे, हेच प्रत्येक सहकारी बँकांचे ध्येय असले पाहिजे. दि वाई अर्बन बँक या सर्व निकषांचे काटेकोर पालन करीत आपल्या प्रगतीची घोडदौड सुरू ठेवत आहे. यामुळेच याही स्पर्धात्मक वातावरणात आपल्या बँकेने ठेवींचा रूपये १०३१ कोटींचा टप्पा व एकूण व्यवसायाचा १७३१ कोटी रूपये हा महत्वपूर्ण टप्पा पार केला आहे.

**बँकेचे कार्यक्षेत्र व शाखा विस्तार :-**

आपल्या बँकेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून कार्यक्षेत्रांतील सर्व ग्राहकांना विविध स्वरूपाच्या

बँकिंग सेवा-सुविधा, विविध ठेवी व कर्ज योजनांद्वारे पुरविण्याचा आपण सातत्याने प्रयत्न करीत असतो. शाखा या व्यवसाय वाढीचे केंद्र असल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार अहवाल सालांत चार नवीन शाखांची भर पडली आहे. त्यानुसार जयसिंगपूर (जि. कोल्हापूर) येथे दि. २७ एप्रिल २०१८ रोजी मा. खा. संजयकाका पाटील, मा. खा. राजू शेट्टी यांच्या हस्ते तर माणगांव (जि. रायगड) येथे दि. १९ ऑक्टोंबर २०१८ रोजी केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना. अनंत गिते यांचे हस्ते तर दि. १ नोव्हेंबर २०१८ रोजी मा. संचालक मंडळाच्या उपस्थितीत गोरेगांव व महाड (जि. रायगड) अशा चार नवीन शाखांचे व त्यास जोडून एटीएम केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच अहवाल सालात वेळे येथे पुणे-सातारा महामार्गावर व पांचगणी-महाबळेश्वर रस्त्यावर मोक्याच्या ठिकाणी दोन ऑफसाईट एटीएम केंद्र आपण सुरू केली आहेत. अशा रितीने दि. ३१ मार्च २०१९ रोजी शाखांची संख्या ३० झाली आहे. तर एटीएमची संख्या १६ वरून २४ झाली आहे.

विशेष बाब म्हणजे ग्राहकांच्या सोयीसाठी दि. १२ मे २०१८ रोजी सोनगीरवाडी शाखेचे आणि १४ जून २०१८ रोजी मेढा शाखेचे एटीएम व लॉकर्स सुविधेसह नवीन प्रशस्त जागेत स्थलांतर करण्यात आले आहे.

अहवाल सालात बँकेच्या एकूण ३० शाखांपैकी २५ शाखा नफ्यामध्ये असून पाच शाखा तोटा दाखवितात. यामध्ये यावर्षी सुरू झालेल्या नवीन चार शाखांचा समावेश आहे. नजिकच्या काळात बँकेच्या सर्व शाखा नफ्यात येतील. असा आम्हांस विश्वास आहे.

**भागभांडवल, भांडवल पर्याप्तता, स्वनिधी व भागधारक :-**

आपल्या बँकेची अधिकृत भागभांडवल मर्यादा रूपये ५० कोटी असून अहवाल वर्षात बँकेचे भागभांडवल गतवर्षीपेक्षा रूपये २९८.२५ लाखाने (१३.२८%) वाढले असून दि. ३१ मार्च, २०१९ रोजी ते रूपये २,५४४.५९ लाख इतके झाले आहे. अहवाल वर्षात मृत्यू पावल्याने वा कर्जफेड झाल्याने २१८ सभासद कमी झाले आणि सभासद संख्येमध्ये १,५७९ सभासदांची वाढ होऊन वर्षाअखेर सभासद संख्या १९,७७५ इतकी झाली आहे. तसेच नियमित सभासदांव्यतिरिक्त नाममात्र सभासद संख्या ३८०७ असून रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ही संख्या नियमित सभासद संख्येच्या २० टक्केपेक्षा कमी आहे.

बँकेचे भागभांडवल, अतिरिक्त नफा व सर्वसाधारण निधी मिळून असलेल्या स्वनिधीची रक्कम गतवर्षीपेक्षा रूपये १९५३.२६ लाखाने वाढून वर्षाअखेर ती रूपये ७२४७.०७ लाख इतकी झाली आहे. स्वनिधी, बँकेच्या आर्थिक सक्षमतेचा मापदंड असून त्यातील वाढ, बँकेची सदृढ आर्थिक परिस्थिती दर्शविते. बँकेच्या स्थैर्याच्या व सक्षमतेच्या दृष्टीने स्वनिधी अत्यंत महत्वाचा असून बँकेची कर्ज वितरण क्षमता देखील स्वनिधीवर अवलंबून असते.

- बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण दि.३१/०३/१९ रोजी १३.३७% इतकी झाले आहे. रिझर्व्ह बँकेने या बाबतीत घालून दिलेल्या कमीत कमी नऊ टक्के या निकषांपेक्षा आपली भागभांडवल पर्याप्तता (सीआरएआर)गेली अनेक वर्षे आपण अधिक राखण्यांत यश मिळवले आहे.

**● ठेवी व ठेव विमा :-**

अहवाल वर्षात इतर बँकांकडून ठेवीवरील व्याजदरात होत असलेल्या तीव्र स्वरूपाच्या स्पर्धेमुळे आणि सर्वसामान्य ठेवीदार हे गुंतवणूकीसाठी म्युच्यूअल फंड, स्थावर मालमत्ता आणि पतसंस्था ठेवी यांकडे आकृष्ठ होत असताना सुद्धा आपल्या बँकेने मात्र जलद, उत्तम व विनयशील ग्राहक सेवा आणि अधिकाधिक व्याजदर देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यामुळेच बँकेच्या ठेवींमध्ये समाधानकारक वाढ झाली आहे.

गतवर्षी म्हणजे दि. ३१/०३/२०१८ रोजी बँकेकडे एकूण ठेवी रूपये ८४१.२३ कोटी इतक्या होत्या. त्यामध्ये अहवाल सालात ९३.४० कोटींची वाढ होऊन त्या रूपये ९३४.६३ कोटी इतक्या झाल्या. ही वाढ ११.१०% इतकी झाली. बँकींग क्षेत्रांतील ठेवींमध्ये घट होत असताना आपल्या बँकेत मात्र सातत्याने व वेगाने वाढणाऱ्या ठेवी हे ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतिक आहे.

विशेष आनंदाची बाब म्हणजे सर्व सभासद, खातेदार व हितचिंतक यांच्या सहकार्याने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच बँकेने रूपये १००८ कोटी ठेवींचा टप्पा पार केला आहे. भारतातील एकूणच १५५३ नागरी सहकारी बँकांपैकी फक्त ८० नागरी सहकारी बँकांच्या ठेवी रूपये १००० कोटींचे वर आहेत. आता आपल्या बँकेचा अशा मोठ्या आकाराच्या सहकारी बँकांमध्ये समावेश झाला आहे. या वेगवान प्रगतीसाठी आणि बँकेवर असणाऱ्या आपल्या अढळ विश्वासाठी तुम्हां सर्वांना मनापासून धन्यवाद!

बँकेकडील ठेवीदारांची सुरक्षितता ही महत्वाची मानली जाते. बँकेमार्फत ठेवीदारांचे प्रति ग्राहक,

रूपये एक लाख रकमेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या ठेवींना विमा व पतहमी निगम (DICGC) मार्फत विम्याचे संरक्षण देण्यात येते. त्याचा हप्ता नियमितपणे डिपॉझीट इन्शुरन्स कॉर्पोरेशनकडे पाठवला जात असून दि. ३०/०९/२०१९ अखेरचा ठेव विम्याचा हप्ता रूपये ५५,१८,०००/- इतका भरलेला आहे.

**कर्जव्यवहार :-**

अहवाल सालात बँकिंग क्षेत्रात कर्जव्याजावरील तीव्र स्पर्धा असतानाही आपल्या बँकेने सर्व प्रकारची कर्जे योग्य प्रमाणात वितरीत करून कर्ज व्यवहारांत समाधानकारकरित्या वाढ केली आहे. सन २०१७-१८ पेक्षा कर्जव्यवहारात रूपये ६८.३० कोटीने वाढ झाली असून दि. ३१ मार्च २०१९ रोजी येणे कर्ज रक्कम रूपये ६३१.६० कोटी इतकी झाली आहे. ही वाढ १२.१२% इतकी आहे. अहवाल वर्षाअखेर बँकेचे येणे असलेल्या कर्जाचे ठेवीशी गुणोत्तर (सीडी रेशो) जे रिझर्व्ह बँक निकषांप्रमाणे आदर्श असे जे ६५ ते ७०% आहे. ते आपल्या बँकेने ६७.७७% इतके ठेवले असून ठेवीदारांच्या ठेवीचे सुयोग्य नियोजन बँकेने केले आहे, हेच दिसून येते. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अग्रक्रम क्षेत्रांतील घटकांस ५४.४७% तर दुर्बल घटकांस १५.५०% कर्जे वितरीत केली आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशानुसार आपल्या बँकेने क्रेडीट इन्फरमेशन ब्युरो इंडिया लिमिटेड (CIBIL) या पत माहिती संस्थेचे (CIC) सदस्यत्व प्राप्त करून घेतले असून या माध्यमातून कर्जदारांचे पतमाहिती अहवाल प्राप्त करून नंतरच कर्जमंजूरीचे निर्णय घेण्यात येतात. याव्यतिरीक्त इक्विफॅक्स क्रेडिट इन्फरमेशन सर्व्हिसेस प्रा.लि., एक्स्पेरिअन क्रेडिट इन्फरमेशन कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. आणि क्रिफ हाय मार्क क्रेडिट इन्फरमेशन सर्व्हिसेस प्रा.लि. या पतमाहिती संस्थांचेही सदस्यत्व प्राप्त करून घेतले असून या सर्व संस्थांमार्फत कर्जदारांची माहिती गोळा करून कर्जमंजूरी प्रक्रियेमध्ये निर्णयाप्रत येताना याचा निश्चितच उपयोग होत आहे.

**• अनुत्पादित कर्जे:-**

अहवाल सालात बँकिंग क्षेत्रामधील वेगाने वाढणारी अनुत्पादित कर्जांची पातळी ही बँकिंग क्षेत्राकरिताच नव्हे तर रिझर्व्ह बँक आणि शासन यांनाही चिंतेची बाब झाली आहे. अशा कर्जांकरीता कराव्या लागणाऱ्या तरतूदींमुळे अनेक सार्वजनिक क्षेत्रांतील बँका तोट्यामध्ये गेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अहवाल वर्षात कर्ज वसुलीसाठी संचालक मंडळ सदस्य, अधिकारी व कर्मचारी या सर्वांनीच थकबाकी वसुलीसाठी सातत्याने प्रयत्न करून अनुत्पादित कर्ज पातळी समाधानकारक आणि रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेप्रमाणे राखण्यात यश मिळविले आहे.

याचा परिणाम म्हणून दि. ३१/०३/२०१९ ची ढोबळ अनुत्पादित कर्जे (ग्रॉस एनपीए) ४.२८% तर निव्वळ अनुत्पादित कर्जे (नेट एनपीए) १.०७% एवढीच आहेत.

**गुंतवणूक व निधी व्यवस्थापन :-**

कर्ज व्यवहाराव्यतिरिक्त बँकेच्या उत्पन्नाचे गुंतवणूक व निधी व्यवस्थापन हे एक प्रमुख साधन आहे. वैधानिक निकषांनुसार ठेवण्यात येणाऱ्या वैधानिक तरलता प्रमाणानुसार सरकारी कर्जरोख्यांत (SLR) निधीची बँकेस ठराविक गुंतवणूक करावी लागते. या व्यतिरिक्त बँक अतिरिक्त निधीची गुंतवणूक इतर योग्य स्वीकार्य निधीमध्ये करीत असते. बँकेने अधिनियम १९४९ चे कलम १८ व २४ मधील तरतूदीस अधीन राहून गुंतवणूकीबाबत रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या नियमांची पूर्णपणे अंमलबजावणी केलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या रोखता (Cash Reserve Ratio) व तरलता (Statutory Liquidity Ratio) बाबतच्या तरतुदींचे काटेकोर पालन करून बँकेने गुंतवणुकीचे योग्य व्यवस्थापन केले आहे.

ठेवींमध्ये भरघोस वाढ झाल्याने अहवाल सालात कर्ज व्यवहारांमध्येसुद्धा भरीव वाढ होऊ शकली. त्याचप्रमाणे गुंतवणूकीमध्येही उपलब्ध व जादा निधीची गुंतवणूक करून वर्षाअखेर एकूण गुंतवणूक रूपये ३३०.१३ कोटी इतकी झाली आहे. ही रक्कम गतवर्षीच्या रूपये ३०१.८८ कोटी म्हणजे ९.३५% अधिक आहे. एकूण गुंतवणूकीपैकी २६१.२४ कोटी सरकारी कर्ज रोख्यांमध्ये तर उर्वरीत रक्कम रूपये ४०.६३ कोटी मान्यताप्राप्त रोख्यांमध्ये आणि मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात आली आहे. सरकारी कर्ज रोख्यांच्या किंमतीत झालेल्या चढ उतारांचा फायदा घेऊन बँकेने अहवाल सालात रूपये ०.२० कोटी इतका नफा रोखे खरेदी विक्री व्यवहारात मिळविला आहे.

बँकेच्या सर्व गुंतवणुकी ह्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व बँकेच्या गुंतवणूक धोरणांनुसार केलेल्या आहेत.

**विमा व्यवसाय :-**

आपली बँक जनरल इन्शुरन्स साठी दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड व आय.सी.आय.सी.आय. लोंबार्ड या सर्वसाधारण विमा कंपनीची 'कॉर्पोरेट एजंट' म्हणून

कार्यरत आहे. तसेच लाईफ इन्शुरन्स साठी कोटक लाईफ इन्शुरन्स कंपनीची कॉर्पोरेट एजंट आहे. या दोन्ही विमा व्यवसायात बँकेने अहवाल साली उत्तम कामगिरी केली आहे. विमा व्यवसायाद्वारे बँकेने यावर्षी रू. १४ लाख ५० हजार इतके उत्पन्न मिळविले आहे.

### संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांची कर्जे-

संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना बँकेमार्फत मंजूर करावयाच्या कर्जावर भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्बंध असलेमुळे अहवाल वर्षात कोणाही संचालकांना व त्यांचे नातेवाईकांना 'ठेवीवरील कर्जेसोडून' कर्जेवितरीत करण्यात आलेली नाहीत. संचालक मंडळाचे सदस्य व नातेवाईक यांनी निवडणूकी पूर्वी घेतलेल्या कर्जाची वसूली नियमित असून त्यात कोणतीही थकबाकी नाही. अशा कर्जांचा दि. ३१/०३/२०१९ चा तपशील खालील प्रमाणे:-

(आकडे रूपये लाखात)

| तपशील | ३१ मार्च २०१८ रोजी येणे | २०१८-२०१९ मधील वाटप | २०१८-२०१९ मधील वसुली | ३१ मार्च २०१९ रोजी येणे | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| संचालकां-कडील | ८१.४८ | १७.३६ | ५.७५ | ९३.०९ | नाही |
| नातेवाईकां-कडील | १३.८० | ७.३७ | ८.७९ | १२.३८ | नाही |

### संचालक मंडळ व समित्यांच्या सभा :-

बँकेचे संचालक मंडळात भारतीय रिझर्व्ह बँकेचे धोरणानुसार अपेक्षीत निष्णात संचालक संख्येपेक्षा आपल्या बँकेत अनेक संचालक या निकषांची पूर्तता करणारे आहेत. त्यामध्ये तीन चार्टर्ड अकौंटन्टस्, दोन ॲडव्होकेट, तीन एक्स बँकर्स आहेत. बाकी संचालकांमध्ये सुद्धा दोन डॉक्टर्स, दोन इंजिनिअर्स, एक माजी प्राध्यापक, एक उद्योजक व तीन व्यापारी संचालक आहेत. अशा प्रकारे बँकेस अत्यंत उच्च विद्याविभूषीत व व्यावसायिक दृष्टीकोन असलेले संचालक मंडळ लाभले असून त्यांनी बँकेच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत मोलाचे योगदान देऊन बँकेच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावला आहे.

गेल्या आर्थिक वर्षात सर्व संचालकांनी संस्थेच्या कामकाजात सक्रीय सहभाग घेऊन सर्वच निर्णय एकमताने घेतले. अहवाल सालात संचालक मंडळाच्या एकूण १६ सभा झाल्या. संचालक मंडळाचे सभेमधील वैयक्तिक सभासदांची उपस्थिती पुढीलप्रमाणे :-

- सीए. श्री. चंद्रकांत काळे — १६
- श्री. राजेंद्र चावलानी — १६
- डॉ.श्री. विनय जोगळेकर — १४
- श्री. मदनलाल ओसवाल — १४
- ॲड. श्री. प्रतापराव शिंदे — १६
- श्री. विवेक भोसले — १५
- ॲड. सीए. राजगोपाल द्रविड — १५
- श्री. विद्याधर तावरे — १४
- श्री. मनोज खटावकर — १६
- प्रा.श्री. विष्णू खरे — १३
- श्री. भालचंद्र देशपांडे — १२
- डॉ.श्री. शेखर कांबळे — १६
- श्री. स्वरूप मुळे — १३
- सौ. अंजली शिवदे — १५
- सौ. गीता कोठावळे — १५
- सीए. श्री. किशोरकुमार मांढरे — १२

संचालक मंडळावरील कामाचा ताण कमी करून त्यांना धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अधिक वेळ मिळावा या उद्देशाने संचालक मंडळाच्या अंतर्गत १) कर्ज समिती २) गुंतवणूक समिती ३) ऑडिट समिती ४) सेवक समिती ५) प्रशासकीय कामकाज समिती ६) वसूली व सामोपचार समिती ७) माहिती व तंत्रज्ञान समिती अशा विविध समित्या नेमण्यात आल्या आहेत. प्रत्येक समितीने आपल्या बैठकीत त्या-त्या विषयांवर सखोल चर्चा व अभ्यास करून आपल्या शिफारसी संचालक मंडळास सादर केल्या. अहवाल सालात विविध समित्यांच्या ४२ सभा वेळोवेळी घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती व योगदान समाधानकारक राहिले आहे.

### नफा वाटणी व लाभांश वितरण :-

संचालक मंडळाच्या प्रगतीशील व व्यावसायिक धोरणांमुळे तसेच कर्मचाऱ्यांनी त्याची तंतोतंत अंमलबजावणी करून व्यवसाय वाढ व कर्ज वसुली यासाठी अथक प्रयत्न केल्याने. बँकेची या आर्थिक वर्षात नफा क्षमता वाढलेली दिसून येते. अहवाल वर्षात बँकेस रूपये १,७०४.९४ लाख इतका ढोबळ नफा तर रूपये ८५१.७७ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे. अहवाल वर्षात रूपये ४९७.३५ लाख इतकी आयकराची तरतूद केल्यानंतरचा हा नफा आहे. गतवर्षीपेक्षा ढोबळ नफ्यांत १९.७८% व निव्वळ नफ्यांत १३.३३% इतकी वाढ झालेली आहे.

गतवर्षीचा शिल्लक नफा रू. ४७८.२७ मिळून एकूण रू. ८,५१,७७,४७८.२७ इतका नफा विभागणीस उपलब्ध आहे. संचालक मंडळाने खालील प्रमाणे नफा विभागणी सुचविलेली असून १०% लाभांशाची शिफारस केलेली आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

| तपशील | रक्कम रूपये | नक्त नफ्याशी प्रमाण % |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | २,१३,००,०००.०० | २५.०० |
| लाभांश (डिव्हीडंड) १०% | २,३६,५५,६२५.०० | २७.७७ |
| इमारत निधी | २,४४,२१,०००.०० | २८.६७ |
| जनरल रिझर्व्ह | ८६,००,०००.०० | १०.१० |
| निवडणूक निधी | ५,००,०००.०० | ०.५९ |
| प्रशिक्षण निधी | ३,००,०००.०० | ०.३५ |
| महोत्सव निधी | ६०,००,०००.०० | ७.०५ |
| सभासद कल्याण निधी | २,००,०००.०० | ०.२३ |
| लाभांश समतोल निधी | १,००,०००.०० | ०.१२ |
| सेवक कल्याण निधी | १,००,०००.०० | ०.१२ |
| शिल्लक नफा | ८५३.२७ | ०.०० |
| एकूण | ८,५१,७७,४७८.२७ | १००.०० |

**वैधानिक लेखापरीक्षण व अंतर्गत लेखापरीक्षण :-**

दि. २० सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून अधिकृत सनदी लेखापालांचे सूची मधून मे. एल. के. एस. ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे या फर्मची नेमणूक केलेली होती. त्यानुसार त्यांनी सन २०१८-२०१९ चे वैधानिक लेखापरिक्षण त्यांनी पूर्ण केलेले असून बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले तसेच उपयुक्त सुचना करून अतिशय चांगले मार्गदर्शनही केले आहे. त्यांनी बँकेला सन २०१८-२०१९ सालासाठी **ऑडिट वर्ग 'अ'** प्रदान केला आहे.

याव्यतिरिक्त बँकेचा स्वत:चा स्वतंत्र असा "अंतर्गत हिशोब तपासणी विभाग असून त्यात बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. या विभागातर्फेही शाखांचे अंतर्गत लेखापरिक्षण तसेच आर्थिक व्यवहारांची तपासणी करून बँकेच्या आर्थिक व्यवहारांवर अंतर्गत नियंत्रण ठेवण्याचे काम केले आहे. या शिवाय बँकेच्या सर्व मोठ्या शाखा व प्रधान कार्यालयाचे अंतर्गत लेखा परिक्षण (इंटरनल ऑडीट) तसेच समावर्ती लेखापरिक्षण (कंकरंट ऑडीट) संचालक मंडळाने नेमलेल्या विविध सनदी लेखापरिक्षकांकडून पूर्ण करून घेतले आहे. या सर्वांनी योग्य वेळेत लेखापरिक्षण पूर्ण करून बँकेस उपयुक्त सूचना व मार्गदर्शन केले आहे.

वरील सर्व लेखापरिक्षकांनी सादर केलेल्या तपासणी अहवालांचे व दोष दुरूस्ती अहवालांचे संचालक मंडळाच्या ऑडीट कमिटी मध्ये मुल्यमापन केले गेले. तसेच दोष दुरूस्ती अहवालांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने झाली का याचीही खात्री केली आहे.

**● रिझर्व्ह बँक तपासणी :-**

बँकींग नियंत्रण अधिनियम १९४९ च्या कलम ३५ अन्वये (सहकारी बँकांना लागू असणारा) भारतीय रिझर्व्ह बँकेने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाची तपासणी अधिकारी श्री. नविनकुमार शाक्य सो (एजीएम) आणि त्यांचे सहाय्यक श्री. मुल्ला सो यांनी नोव्हेंबर २०१८ मध्ये पूर्ण केली. त्यांचा अहवाल दि. २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी प्राप्त झाला असून त्यावरील दोष दुरूस्ती अहवाल विहीत मुदतीत रिझर्व्ह बँकेस सादर करण्यात आला आहे. तपासणी प्रसंगी रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी बँकेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले असून त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा व उपयुक्त सूचनांचा बँकेस निश्चितच उपयोग होईल. यासाठी बँक त्यांची अत्यंत आभारी आहे.

**कर्मचारी वृंद-प्रशासन व प्रशिक्षण :-**

कर्मचाऱ्यांचे बँकिंग व तंत्रज्ञान क्षेत्रातील अद्ययावत राहावे यासाठी संचालक मंडळ आग्रही भूमिका घेत असते. कर्मचाऱ्यांच्या एकूण क्षमतेचा विकास करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी सहकारी बँकिंग क्षेत्रातील तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजीत करून कर्मचाऱ्यांचे ज्ञान, अद्ययावत करण्याचा प्रयत्न बँकेने केला आहे. तसेच प्रशिक्षण देणाऱ्या विविध मान्यताप्राप्त संस्थांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी आपल्या कर्मचाऱ्यांना पाठविले होते. प्रशिक्षण ही गुंतवणूक असते, ही संचालक मंडळाची धारणा असल्याने कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रम वर्षभर सातत्याने राबविले गेले.कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना, साहित्य गुणांना वाव मिळावा, त्याचबरोबर त्यांचे बँकिंगचे ज्ञान वाढावे, यासाठी दर सहामाहीस अंतर्गत वितरणासाठी विनामूल्य अशी जिव्हाळा नावाची पुस्तिका प्रकाशित होते. ही प्रक्रिया गेली आठ वर्षे सातत्याने सुरू आहे. याकामी तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनासाठी रिझर्व्ह बँकेतील निवृत्त अधिकारी श्री. अविनाश जोशी यांचे मोलाचे योगदान आहे.

**संगणकीकरण व अत्याधुनिक तंत्रज्ञान :-**

बँकींग क्षेत्रातील सध्याची स्पर्धा व आव्हाने लक्षात घेता तसेच तरूण पिढीस बँकींग करीता आपल्याकडे आकृष्ट करण्यासाठी, ग्राहकांना तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करत नवनवीन डिजीटल सेवा पुरविणे, ही काळाची गरज बनली आहे. अहवाल सालात याच उद्देशाने ग्राहकांना त्वरीत रक्कम पाठविण्यासाठी आरटीजीएस, एनईएफटी

तसेच ई-कॉमर्स सेवा मोफत प्राप्त करून दिल्या आहेत.

बँकेने २० शाखांमध्ये एटीएम सेवा उपलब्ध करून दिली असून दोन ऑफसाईट ए.टी.एम. वेळे येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर तसेच पांचगणी-महाबळेश्वर रस्त्यावर भोसे येथे कार्यान्वित केली आहेत. बँकेची www.waibank.co.in अशी वेबसाईट असून त्यावर बँकेची सर्व माहिती, विविध ठेवी, कर्जाच्या योजना आणि वार्षिक अहवालही उपलब्ध करून देणेत आला आहे. भविष्यात देखील याच दिशेने व गतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत ग्राहकांना सेवा पुरविण्यावर बँक भर देणार आहे.

**पुरस्कारांचा वर्षाव :-**

आपणा सर्व सभासदांना अभिमान वाटावा, अशी गोष्ट म्हणजे अहवाल सालात आपल्या बँकेस तसेच व्यक्तिगतरित्या माननीय अध्यक्ष सीए. श्री. सी. व्ही. काळे, ज्येष्ठ संचालक माननीय डॉ.श्री. विनय जोगळेकर तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. श्रीपाद कुलकर्णी यांना विशेष पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

अहवाल सालात बँकेस विविध नामवंत संस्थांतर्फे खालील पुरस्कार प्राप्त झाले.

१) बँकिंग फ्रंटीयर - मुंबई या देशपातळीवरील संस्थेचे पाच पुरस्कार बँकेस प्राप्त झाले. त्यामध्ये बेस्ट चेअरमन, उत्कृष्ट मानव संसाधन व व्यवस्थापन, उत्कृष्ट ग्राहक संपादन, उत्कृष्ट एटीएम विस्तारीकरण आणि बेस्ट फ्रॉड कंट्रोल इनिशिएटीव्ह या क्षेत्रांत हे पुरस्कार प्राप्त झाले.

२) पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने उत्कृष्ट कामगिरी करणारी नागरी सहकारी बँक गौरव पुरस्कार, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व दळणवळण मंत्री मा.ना.श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

३) कर्नाडस् बँकिंग रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट फौंडेशन आयोजित सहकार बँकिंग परिषदेत कोल्हापूर येथे सर्वोत्तम अध्यक्ष, सर्वोत्तम मुख्य कार्यकारी अधिकारी, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन व सर्वोत्तम वार्षिक अहवालासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

४) अविज पब्लिकेशन कोल्हापूर आणि गॅलेक्सी इन्मा पुणे यांचे संयुक्त विद्यमाने सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट बँक म्हणून आपल्या बँकेस बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार २०१८ ने गौरविण्यात आले. सलग चौथ्या वर्षी हा पुरस्कार बँकेस प्राप्त होतो आहे.

५) अहवाल सालात आपल्या बँकेचे अध्यक्ष मा.सीए श्री. सी.व्ही. काळे यांना त्यांच्या सामाजिक, आर्थिक, बँकिंग व सहकार क्षेत्रातील त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल **वाई भूषण पुरस्कार** महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच त्यांना महाराष्ट्र जर्नालिस्ट फौंडेशनचा प्राईड ऑफ इंडिया सहकार भूषण भास्कर अॅवॉर्ड आणि सकाळ मिडीया समूहातर्फे सकाळ एक्सलन्स अॅवॉर्ड २०१९ प्राप्त झाले. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

६) बँकेचे ज्येष्ठ संचालक मा.डॉ.श्री. विनय जोगळेकर यांना पळशी, ता.खंडाळा येथील कै. लक्ष्मणराव भरगुडे - पाटील यांच्या ३७ व्या स्मृतीदिनी जीवनगौरव पुरस्कार, मराठी अभिनेते मा. श्री. सचिन खेडेकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत देऊन गौरविण्यात आले. मा. डॉ. श्री. जोगळेकर यांनी गेली ३५ वर्षे वैद्यकिय सेवेचे माध्यमातून सर्व सामान्य गोरगरिब जनतेची केलेली सेवा, ज्ञानवर्धिनी संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात आणि वाई अर्बन बँकेच्या माध्यमातून बँकिंग क्षेत्रात गौरवास्पद केलेल्या भरीव कामगिरीबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचेही मनापासून अभिनंदन.

७) आपल्या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाद कुलकर्णी यांना महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेमार्फत राज्यातील सहकारी संस्थाना मार्गदर्शन करणाऱ्या समितीमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून निवडण्यात आले आहे. त्यांचेही हार्दिक अभिनंदन!

**सामाजिक बांधिलकी :-**

सामाजिक बांधिलकीचे भावनेतून बँक अनेक गरजू व्यक्तींना व संस्थांना मदत देत असते. या आर्थिक वर्षातही वाईतील विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संघटना व कृष्णाबाई संस्थान घाट उत्सव मंडळांना बँकेने जाहिरात रूपाने आर्थिक मदत केली.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सर्व सभासदांचा रू. ३ लाखाचा अपघाती विमा बँकेने उतरविला आहे. या विमा योजनेचा फायदा ५ सभासदांच्या वारसांना झाला आहे.

तसेच कर्मचाऱ्यांसाठी कोटक लाईफ कंपनी बरोबर प्रत्येकी रू. ५ लाखाची टर्म लाईफ इन्शुरन्स पॉलिसी काढली आहे. या विम्यांच्या हप्त्याची रक्कम बँक भरत असते.

वाई शहर सुशोभिकरणाच्या प्रक्रियेत वाईतील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये आकर्षक दिपमाळ उभारली आहे.

अभ्यास करून चांगले गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम बँक सतत करत असते. यावर्षीही बँकेचे सभासद व कर्मचारी यांचे गुणवत्ता प्राप्त पाल्यांचे त्यांनी मिळविलेल्या परिक्षेतील विशेष

सुयशाबद्दल बँकेचे अध्यक्ष मा. सीए श्री.चंद्रकांत काळे यांचे हस्ते संचालक व कर्मचारी यांचे उपस्थितीत आर्थिक बक्षिस देऊन कौतुक व गौरव करण्यात आला.

सांगली, कोल्हापूर या परिसरात ऑगस्ट महिन्यात अभूतपूर्व अशी पूरपरिस्थिती निर्माण झाली. २००५ सालानंतर पुन्हा एकदा महापूराने थैमान घातले आणि अपरिमित जीवीत व वित्त हानी झाली आहे. या पार्श्वभूमीवर बँकेने खारीचा वाटा म्हणून पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व मदतीसाठी रूपये २५ लाखांची तातडीची मदत मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरीता सुपूर्द केली आहे. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीला पूरग्रस्त जनतेच्या पुनर्वसनकामासाठी १ लाख ५१ हजार रूपयांचा निधी दिला आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली :-**


कै. वेदमुर्ती शंकरराव अभ्यंकर


कै.डॉ. भालचंद्र दातार

बँकेचे माजी संचालक व मार्गदर्शक वेदमुर्ती शंकरराव अभ्यंकर यांचे वयाच्या १०१ व्या वर्षी दि. २७ जुलै २०१९ रोजी दुःखद निधन झाले. ते पुरोगामी वैदिक विद्वान होते. अखेर पर्यंत त्यांचा आवाज खणखणीत होता. बँकेच्या अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांनी वैदिक मंत्रपठण करून आशीर्वाद दिले. ते सामाजिक कार्यकर्तेही होते. अनेक वर्षे त्यांनी वसंत व्याख्यानमाला चालविली होती. आपल्या बँकेचे ते संचालक असताना त्यांचे योगदान हे वैशिष्ट्यपूर्ण होते. शेवटपर्यंत बँकेच्या स्थितीवर व प्रगतीवर त्यांचे बारीक लक्ष होते. तसेच बँकेचे माजी संचालक व वाईतील प्रसिद्ध वैद्यक व्यावसायिक डॉ. भालचंद्र दातार यांचेही नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांनीही आपल्या काळात बँकेच्या प्रगतीसाठी मोठे योगदान दिले होते. यादोन्ही माजी संचालकांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री, बेधडक व कडक शिस्तीच्या संसदपटू, भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आणि ओघवती वाणी असलेल्या उत्कृष्ट वक्त्या श्रीमती सुषमा स्वराज यांचे नुकतेच निधन झाले त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे महापूरात बळी गेलेल्या पूरग्रस्तांनाही भावपूर्ण श्रद्धांजली.

अहवाल सालात दिवंगत झालेले थोर राजकीय नेते, शास्त्रज्ञ, साहित्यीक, संशोधक, कलावंत, खेळाडू, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, मातृभूमीचे व देशाच्या सीमांचे रक्षण करताना शहिद झालेले वीर जवान, अतिरेक्यांचे व नक्षलवाद्यांचे कारवायांना बळी पडलेले जवान व निष्पाप जीव तसेच आपल्या कर्मचाऱ्यांच्या जवळचे दिवंगत झालेले नातेवाईक यांना बँकेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली, त्यांचे आत्म्यास ईश्वर चिरशांती देवो हीच प्रार्थना. त्याचप्रमाणे अन्य ज्ञात -अज्ञात दिवंगत मान्यवर तसेच बँकेचे ज्ञात-अज्ञात सभासद, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक ज्यांना काळाने आपणांतून हिरावून नेले आहे, त्यांचे कुटुंबियांचे दुःखात वाई अर्बन बँक परिवार सहभागी असून दिवंगतांचे आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**ऋणनिर्देश व आभार :-**

बँकेवर दाखविलेल्या दृढ विश्वासासाठी आणि बँकेच्या सर्वांगीण प्रगतीस सदैव पाठींबा देणाऱ्या सर्व भागधारकांचे आम्ही ऋणी आहोत. तसेच बँकेच्या प्रगतीमध्ये सातत्याने सहकार्य करणाऱ्या सर्व ग्राहकांच्या व हितचिंतकांप्रती आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नागरी सह. बँक विभागातील अधिकारी, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य व त्यांचे अधिकारी, बँकेच्या पॅनलवरील सर्व कायदे विषयक सल्लागार, वैधानिक व अंतर्गत लेखापरिक्षक, सर्व्हेअर्स/मुल्यांकनकर्ते, सराफ, स्थानिक सल्लागार सदस्य, आधुनिक तंत्रज्ञान पुरविणाऱ्या संस्था व त्यांचे अधिकारी तसेच माजी संचालक, विविध प्रशिक्षण संस्था, विमा कंपनीज् यांचे बँकेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभत असते. आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. बँकेच्या विविध उपक्रमास लोकाभिमुख करणारे व त्वरीत प्रसिद्धी देणारे सर्व पत्रकार बंधूंचेही मनःपूर्वक आभार. बँकेच्या प्रगतीमध्ये तसेच संचालक मंडळाच्या ध्येय धोरणांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यामध्ये बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी व सेवकवर्ग यांचे फार मोठे सहकार्य व योगदान आहे. त्यांचेही मनापासून अभिनंदन व कौतुक.

आपला स्नेहांकित,
सीए. चंद्रकांत वामनराव काळे,
अध्यक्ष

## शाखा सूची

| अ.नं. | कार्यालय/शाखा | पत्ता | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रधान कार्यालय | ५९१, गणपती आळी, वाई, ता.वाई, जि.सातारा - ४१२८०३ | ०२१६७-२२०७७७ |
| २ | वाई मुख्य शाखा | ५९१, गणपती आळी, वाई, ता.वाई, जि.सातारा - ४१२८०३ | ०२१६७-२२०००७ |
| ३ | पांचगणी | पांचगणी एस.टी.स्टॅण्ड समोर, पांचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा - ४१२८०५ | ०२१६८-२४०२२० |
| ४ | लोणंद | शास्त्री चौक, सातारा पुणे रस्ता, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा - ४१५५२१ | ०२१६९-२२५१५६ |
| ५ | शिरवळ | जिव्हाळा, एस.टी.स्टॅण्ड जवळ, शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा - ४१२८०१ | ०२१६९-२४४२०३ |
| ६ | कृष्णानगर, सातारा | सातारा कोरेगांव रोड, नाईक विटभट्टीजवळ, कृष्णानगर, सातारा - ४१५००३ | ०२१६२-२४४११९ |
| ७ | उंब्रज | गजलक्ष्मी कॉम्प्लेक्स, उंब्रज, ता.कराड, जि.सातारा - ४१५१०९ | ०२१६४-२६४३६८ |
| ८ | मेढा | महेश रेसिडेन्सी, तहसिलकार्यालयाजवळ, मेढा, ता.जावली, जि.सातारा - ४१५०१२. | ०२३७८-२८५३७७ |
| ९ | मलकापूर (कराड) | कलश प्राईड, हॉटेल, संगम जवळ, मलकापूर, ता.कराड, जि.सातारा - ४१५५३९. | ०२१६४-२२३३१९ |
| १० | सोनगीरवाडी, वाई | वाई पोलीस स्टेशन समोर, सोनगीरवाडी, वाई, जि.सातारा - ४१२८०३ | ०२१६७-२२७१७७ |
| ११ | सातारा शहर | तुळजाभवानी कॉम्प्लेक्स, यादोगोपाळ पेठ, सातारा, ता.जि. सातारा -४१५००१ | ०२१६२-२८०६७७ |
| १२ | आरफळ | आरफळ, पो. वडूथ, ता.जि. सातारा. - ४१५०११ | ०२१६२-२६४२०८ |
| १३ | फलटण | कृष्णा हाईटस्, रविवार पेठ, शिवाजी चौक, फलटण, जि.सातारा - ४१५५२३ | ०२१६६-२२००७७ |
| १४ | सदाशिवपेठ, पुणे | १९९९, सदाशिव पेठ, अभिनव कला महाविद्यालयासमोर, टिळकरोड, पुणे - ४११०३० | ०२०-२४४७७३७७ |
| १५ | विश्रामबाग, सांगली | २५ कोरे टेरेस, नेमीनाथनगर, गणपती मंदिराजवळ, विश्रामबाग, सांगली - ४१६४१५ | ०२३३-२३०३८७७ |
| १६ | सिंहगडरोड, पुणे | ५४५/१४, अजिंक्यतारा, पी.एल.देशपांडे गार्डन समोर, सिंहगडरोड, पुणे - ४११०३० | ०२०-२४२५२७७७ |
| १७ | बिबवेवाडी, पुणे | ६३५/२,६४२,६४३, प्लॉट नं. १, महेश को-ऑप. हौसिंग सोसा., बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ | ०२०-२४४११९७७ |
| १८ | हडपसर, पुणे | फॉर्च्युन इस्टेट, प्लॉट नं. ५८, पुणे-सोलापूर रोड, हडपसर पुणे - ४११०२८ | ०२०-२६९९८३७७ |
| १९ | चाकण | नानास्मृती, भाजीमंडईजवळ, चाकण, ता.खेड, जि.पुणे - ४१०५०१ | ०२१३५-२४९२७७ |
| २० | थेरगांव, पुणे | सर्व्हे नं. २१/१ ए, डांगे चौक, थेरगांव, जि.पुणे - ४११०३३ | ९९२२४१९६४० |
| २१ | कोथरूड, पुणे | आनंद निलय सोसायटी, महर्षी कर्वे पुतळ्याशेजारी, कोथरूड, पुणे - ४११०३८ | ०२०-२५४३१६५६ |
| २२ | आंबेगांव, पुणे | बेलदरे प्रेस्टीज, रिलायन्स फ्रेश मॉल जवळ, आंबेगांव, पुणे - ४११०४६ | ०२०-२४३६२२७७ |
| २३ | उत्तमनगर शिवणे, पुणे | पंढरीनाथ सोसायटी, एनडीए रोड,मौजे शिवणे-उत्तमनगर, ता.हवेली, जि.पुणे ४११०२३ | ०२०-२५२९२०११ |
| २४ | नसरापूर, पुणे | हरि ओम बिल्डींग, पुणे-वेल्हा मार्ग, मु.पो. नसरापूर, ता. भोर, जि. पुणे - ४१२२१३ | ०२११३-२७२१७७ |
| २५ | गावभाग सांगली | मॉडर्न बेकरी शेजारी, दिनानाथ चौक, गांवभाग सांगली. - ४१६४१६ | ०२३३-२३३३७७७ |
| २६ | वाशी - नवी मुंबई | सेक्टर १९, एपीएमसी सेंट्रल बिल्डींग, विकास टप्पा-२, मार्केट-१, वाशी- ४००७०५ | ०२२-२७८८०३७७ |
| २७ | पाचवड | कुडाळ फाटा, उड्डान पुला शेजारी, पाचवड, ता.वाई, जि.सातारा - ४१५०१५ | ७५०७६२६४७७ |
| २८ | जयसिंगपूर | गल्ली नं. ८, आझाद रोड, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर - ४१६१०१ | ०२३२२-२२७२७७ |
| २९ | माणगांव | नगरपंचायत मि.नं. ७९७, तळमजला, खांदाड रोड, माणगाव, ता.माणगाव, जि.रायगड | ०२१४०-२६३२७७ |
| ३० | गोरेगाव | ग्रामपंचायत मि.नं. २६६, वृंदावन सोसायटी, ब्राह्मण आळी, गोरेगाव, ता. माणगाव, जि.रायगड | ०२१४०-२५०१११ |
| ३१ | महाड | नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. १५७, तळमजला, प्रभात कॉलनी, जुना पोस्ट , महाड, ता.महाड, जि.रायगड | ०२१४५-२२३०७७ |

## सर्व सभासद/ग्राहकांसाठी महत्वाच्या सूचना

१) बँकेचे पोटनियम क्र. ११ (१) (ब) प्रमाणे सामान्य सभासदाने बँकेचे किमान १०० भाग (रूपये २५ प्रमाणे) धारण करणे आवश्यक आहे. यासंदर्भात यापूर्वीही फरक रकमेचा भरणा करण्यासबंधी सूचना देणेत आली होती. तथापि काही सभासदांनी अद्यापही त्याची पूर्तता केलेली नाही. तरी संबंधित सभासदांनी कमी असलेल्या रकमेचे भाग त्वरीत खरेदी करावेत. अशा सभासदांनी बँकेत संपर्क साधावा.

२) बँकेचे पोटनियम क्र. १५ नुसार क्रियाशील सभासद होण्यासाठी सामान्य सभासदांची किमान रू. १०,०००/- ठेव बँकेकडे असली पाहिजे अथवा सभासदाने किमान रू. ५०,०००/- इतके कर्ज (ठेव तारण वगळून) घेतले असले पाहिजे. याशिवाय अगोदरच्या सलग पाच वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस तो उपस्थित राहिला पाहिजे.

३) फक्त क्रियाशील सभासदांनाच निवडणुकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार राहिल. तसेच क्रियाशील सभासदांस कायद्याच्या कलम ७३(सी ए) (१) (i)मध्ये वर्णन केल्यानुसार थकबाकीदार झाल्यास मतदान करता येणार नाही.

४) ज्या सभासदांना त्यांची शेअर्स सर्टिफिकेटस मिळाली नसतील, त्यांनी ती कृपया संबंधित शाखा कार्यालयातून घेऊन जावीत. लाभांशाची रक्कम सभासदांच्या आपल्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्यात येईल. यासाठी सर्व सभासदांचे बचत खाते बँकेत असणे आवश्यक आहे. सभासदांनी त्यांचा लाभांश तीन वर्षाचे आत न नेल्यास पोटनियमातील तरतूदी नुसार ती रक्कम गंगाजळीत जमा होते व ती पुन्हा सभासदांना देता येत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

५) मयत सभासदांची नावे त्यांच्या नातेवाईकांनी बँकेस कळवावी, म्हणजे बँकेचे सभासदांचे रेकॉर्ड अद्ययावत करता येईल.

६) सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास, बदललेल्या पत्याच्या पुराव्यासह बँकेस नवीन पत्ता कळवावा. तसेच आपला ई-मेल आयडी व व्हॉटसप मोबाईल क्रमांक बँकेकडे नोंदवावा.

७) सभासदाने आपले शेअर्ससाठी वारसनोंद करणे गरजेचे आहे. तरी ज्या सभासदांनी अद्याप अशी वारस नोंद केली नसेल, त्यांनी वारस नोंद त्वरीत करावी.

८) रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार आपले शेअर्स/बचत/चालू/मुदत ठेव खात्यावरील व्यवहारांसाठी आपला ग्राहक ओळखा (Know your Customer) या बाबतची ग्राहकांची माहिती अद्ययावत करावी. यासंबंधीची पूर्तता करण्यासाठी आपले बचत/चालू/मुदत ठेव खाते असलेल्या शाखेमध्ये पुढील कागदपत्रे त्वरीत दाखल करावीत, ही विनंती. (ओळखपत्र- उदा. आधारकार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, फोटोसह पत्त्याचा पुरावा इ.)

९) रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार बँकेमधील सर्व खाती ही आधारकार्डशी जोडणे/लिंक करणे आवश्यक आहे. शासनाच्या सर्व योजनांचे लाभ आधारलिंक खात्यावरच शासनाकडून दिले जात असल्यामुळे सर्व खातेदारांनी आधार कार्डची पूर्तता करून घ्यावी.

१०) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार बँक खात्यावर २ वर्ष वा त्याहून अधिक कालावधीत व्यवहार न केल्यास अशी खाती Dormant Accounts म्हणून वर्गीकृत करण्यात येतात. सदर बाबींची बँकेच्या समस्त खातेदारांनी नोंद घ्यावी व अशा खात्यावर पुढील कारवाई टाळण्यासाठी, खात्यावर नियमितपणे व्यवहार करावेत, अशी विनंती आहे.

११) १० वर्षापेक्षा जास्त काळ, ज्या खात्यांवर व्यवहार नाहीत, अशा खात्यांवरील रक्कम रिझर्व्ह बँक **DEAF** फंडाकडे वर्ग करावी लागत असलेने खातेदारांनी नजिकच्या शाखेशी संपर्क साधून आपली खाती नियमित करून घ्यावीत.

१२) विशेष सुचना :- केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार सर्व शाखांमधील एकत्रित एकूण ठेवींवरील (रिकरिंग डिपॉझीट सह) ज्येष्ठ नागरिकांना रू. ५०,०००/- व सामान्य नागरीकांना रू. ४०,०००/- त्यापेक्षा अधिक वार्षिक व्याज असल्यास बँकेस आयकर कपात करणे बंधनकारक आहे. तरी सर्व ग्राहकांनी TDS न होणेकरिता फॉर्म १५ जी /१५ एच आपल्या शाखेत सादर करावेत, ही विनंती.

## दिनांक ३१/०३/२०१९

| ३१/०३/२०१८ रूपये पैसे | भांडवल व देणे | परिशिष्ट क्र. | ३१/०३/२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ५०,००,००,०००.०० | **अधिकृत भागभांडवल** | | ५०,००,००,०००.०० |
| | (२,००,००,००० शेअर्स रू. २५/- प्रमाणे प्रत्येकी) | | |
| २२,४६,३४,३५०.०० | **वसूल झालेले भाग भांडवल** | | २५,४४,५८,७२५.०० |
| | (१,०१,७८,३४९ शेअर्स रू. २५/- प्रमाणे प्रत्येकी) | | |
| ५५,०३,७४,९६३.३६ | राखीव व इतर निधी | १ | ८१,२९,५५,६५१.०८ |
| ८,३९,१८,२८,८६६.५० | ठेवी व इतर खाती | २ | ९,३१,९९,६१,७७९.९२ |
| - | बाहेरील कर्जे | | - |
| १,३२,७७४.२० | वसुलीकरिता घेतलेली बिले (दुबेरजी) | | १,९२,६५४.०० |
| १६,४६,५७,१२२.२४ | थकित व्याज तरतूद (रिझर्व्ह) | ३ | २०,१५,५३,९२७.९९ |
| २,०४,६८,१८३.२८ | देय व्याज | | २,६३,४५,५१७.७४ |
| १५,०७,८३,४९७.९२ | इतर देणी | ४ | ७,९५,३६,३२३.५७ |
| - | शाखा मिळवणी | | ९,७८,४०७.३५ |
| ८५,९५,०००.०० | बँक गॅरंटी (दुबेरजी) | | - |
| ७,५१,६१,८६१.४१ | नफा | | ८,५१,७७,४७८.२७ |
| | शिल्लक नफा : ४७८.२७ | | |
| | चालू सालचा नफा : ८,५१,७७,०००.०० | | |
| ९,५८,६६,३६,६१८.९१ | **एकूण** | | १०,७८,११,६०,४६४.९२ |

सभासदांसाठी स्विकारलेल्या जबाबदाऱ्या बँक गॅरंटी रू. ८७,२५,०००/- व डिफ पेअेबल रू. ५३,०३,४६२/-
लेखापरीक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

| संतोष अ. बागुल | चंद्रशेखर श. काळे | श्रीपाद कुलकर्णी | विद्याधर वि. तावरे | डॉ. विनय मु. जोगळेकर |
|---|---|---|---|---|
| उपसरव्यवस्थापक | उपसरव्यवस्थापक | मुख्य कार्यकारी अधिकारी | संचालक | संचालक |

# रोजीचे ताळेबंद पत्रक

| ३१/०३/२०१८ रूपये पैसे | मालमत्ता व येणे | परिशिष्ट क्र. | ३१/०३/२०१९ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ३४,८४,०६,२१७.९९ | रोख व बँकांतील शिल्लक | ५ | ४२,०७,७१,५५९.१५ |
| ६,१४,८८,३८५.१३ | इतर बँकांतील शिल्लक | ६ | ८,३९,७०,८७१.०७ |
| - | मागणी व अल्प सूचना ठेवी | | - |
| ३,०१,८८,९६,९११.०९ | गुंतवणूक | ७ | ३,३०,१३,०५,८७६.२४ |
| - | शासनाच्या प्रमुख अथवा सहाय्यकारी निधीतून गुंतवणूक | | - |
